आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या व दक्षता पथकातील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः सकआ-२०१७/२/प्र.क्र.८२/आस्था २,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १८ ऑक्टोंबर, २०१७.

वाचा : १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सकआ-२०१७/२/ प्र.क्र.८१/ आस्था-२, दि.२३.३.२०१७

२) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/आस्था-६/अस्थायीपदे/मंजुरी/२०१७-१८/का.६/ २२६३, दि.७.१०.२०१७.

३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.३.१०.२०१७

शासन निर्णय :-

आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती व दक्षता पथकातील ३७४ अस्थायी पदांना दि.३०.९.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दि.२३.३.२०१७ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. शासन निर्णय दिनांक १.६.२०१६ व दि.११.११.२०१६ अन्वये जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या गठित करण्यात आलेल्या असून त्यांन्वये जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या व दक्षता पथकांसाठी एकूण ३७४ अस्थायी पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

३. शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ३.१०.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागाच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापुर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार सर्व प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

४. प्रस्तुत शासन निर्णयान्वये आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या व दक्षता पथकांसाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण ३७४ अस्थायी पदांना दि.१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दि. ३ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१८१३१२३२८२२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2017.10.18 13:00:10 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे

३) संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण
४) संचालनालय, पुणे
५) सर्व प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण
६) सर्व उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
७) सर्व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण
८) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
९) महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपुर
१०) अधिदान व लेखा अधिकारी,
११) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३) वित्त विभाग, कार्या.व्यय -१४/ अर्थसंकल्प-१९, मंत्रालय, मुंबई
१४) कक्ष अधिकारी (मावक/अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५) निवडनस्ती आस्था -२ (३ प्रती).